सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे श्रध्दाजंलीचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | श्रध्दांजलीचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १. | सौ.दिपमाला मनोज काळे, मा.महापौर | १.तत्कालीन जळगांव नगरपालिकेचे नगराध्यक्ष श्री.कांतिलाल तुकाराम चौधरी यांचे जेष्ठ बंधू उदयोजक कै.सुरेश तुकाराम चौधरी, २) जळगांव शहरातील नागरीक कै.सिंधूबाई बाबुराव पाटील, ३) जळगांव शहरातील नागरीक कै.विमलबाई काशिनाथ अत्तरदे यांचे दुखद: निधनाबद्दल. |
| २. | सौ.उज्वला मोहन (किरण) बेंडाळे | तत्कालीन जळगांव नगरपालिकेचे नगराध्यक्ष श्री.कांतिलाल तुकाराम चौधरी यांचे जेष्ठ बंधू उदयोजक कै.सुरेश तुकाराम चौधरी यांचे दुखद: निधनाबद्दल. |
| ३. | श्री.विष्णू रामदास भंगाळे | **जयंती** :- १) मा.छ.संभाजी महाराज यांच्या जयंती निमित्त अभिवादन, २) वारकरी संप्रदायातील थोर संत सेना महाराज यांच्या जयंती निमित्त अभिवादन, ३) थोर स्वातंत्र सेनानी कर्मयोगी धनाजी नाना चौधरी यांच्या १३५ व्या जयंती निमित्त अभिवादन.<br>**श्रध्दांजली** :- १) तत्कालीन जळगांव नगरपालिकेचे नगराध्यक्ष श्री.कांतिलाल तुकाराम चौधरी यांचे जेष्ठ बंधू तसेच श्री.भुषण सुरेश चौधरी यांचे वडील उदयोजक कै.सुरेश तुकाराम चौधरी, २) दिक्षीत वाडी येथिल श्री.अनिल एकनाथ खडके यांचे मोठे बंधू तसेच श्री.ललित खडके यांचे वडील कै.सुभाष एकनाथ खडके यांचे दुखद: निधनाबद्दल. |

श्रध्दांजली बाबत आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उपरोक्त दु:खद घटनेबाबत सभागृहाला अत्यंत दु:ख होत आहे. परमेश्वर इहलोक सोडून गेलेल्या मृतात्म्यास चिरशांती प्रदान करो, त्यांच्या समस्त कुटूंबियांचे दु:खात सभागृह सहभागी असून त्यांचे कुटूंबियांना, मित्र परिवारास दु:ख सहन करण्याची शक्ती प्रदान करो या भावनेसह सभागृहाने दोन मिनीटे शांत उभे राहून दिवगंत आत्म्यांना श्रध्दांजली अर्पण केली.

**सही /-**
**(दिपमाला मनोज काळे)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**
**नगरसचिव,महानगरपालिका,जळगांव.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे अभिनंदनाचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र | सन्मा.सदस्यांचे नांव | अभिनंदनाचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १. | १. सौ.दिपमाला मनोज काळे, मा.महापौर<br>२. सौ.रंजना विजय वानखेडे | १) मा.एन.रंगासामी, मुख्यमंत्री — पुदुचेरी (केंद्रशासित प्रदेश)<br>२) मा.शुभेंदु अधिकारी, मुख्यमंत्री - पश्चिम बंगाल<br>३) मा.हिमंत बिस्वा सरमा, मुख्यमंत्री - आसाम<br>४) जळगांव मनपा,सन्मा.सदस्या,डॉ.अमृता चंद्रकांत सोनवणे यांनी जिल्ह्याच्या सामाजिक, शैक्षणिक व क्रिडा क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी केल्याबद्दल जिल्हा युवा पुरस्काराने सन्मानित झाल्याबद्दल अभिनंदन<br>५) कु.तेजस्विनी विनोद सोनवणे यांना स्केटींग खेळातील उत्कृष्ठ कामगिरी बद्दल भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम जीवन गौरव पुरस्कार २०२६ ने सन्मानित झाल्याबद्दल अभिनंदन.<br>भारतातील विविध राज्यातील उपरोक्त नवनिर्वाचित माननीय मुख्यमंत्री यांनी मिळविलेल्या यशा बद्दल तसेच शहरातील सन्मा.सदस्या यांनी विविध क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी केल्याबद्दल अभिनंदन. |

उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने हे सभागृह अभिनंदन करीत असुन त्यांचे उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत आहोत.

**सही /-**
**(दिपमाला मनोज काळे)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**
**नगरसचिव,महानगरपालिका,जळगांव.**

दिनांक ३०/०३/२०२६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण व अर्थसंकल्पीय विशेष महासभेचे तसेच दि.१५/०४/२०२६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त कायम करणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, दिनांक ३०/०३/२०२६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण व अर्थसंकल्पीय विशेष महासभेचे तसेच दि.१५/०४/२०२६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ६५ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- श्री.बालाणी प्रकाश रावलमल (पिकी)**
**अनुमोदक :- श्री.बरडे नितीन मनोहर**

**सही /-**
**(दिपमाला मनोज काळे)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**
**मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.**

म.न.पा.चौबे कन्या माध्यमिक विदयालयातील श्री.सुधाकर सिताराम पाटील (उपशिक्षक) यांना एकाच पदावर सलग २४ वर्षे सेवा झालेली असल्याने त्यांना निवडश्रेणी लागु करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, उपायुक्त (सा.क.),जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव यांनी सदर विषय तांत्रिक कारणामुळे पुढील महासभेपर्यंत मागे घेण्याबाबत पत्र दिलेले असून त्याअनुषंगाने प्रशासनाकडुन आलेला प्रस्ताव तहकुब करण्यात येत आहे.

**सर्वानुमते तहकुब**

**अनुकुल मते :- ६५ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- श्री.सुर्यवंशी रुद्रेंद्र ऊर्फ दिपक प्रभाकर**

**अनुमोदक :- श्री.बालाणी प्रकाश रावलमल (पिकी)**

**सही /-**
**(दिपमाला मनोज काळे)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**
**मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.**

शहरातील GST भवन जवळील अर्ध गोलाकार चौक सुशोभिकरण करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगांव शहरातील चौक डिव्हायडर खाजगी संस्था उद्योजक इत्यादी मार्फत सुशोभिकरण करणेबाबत महासभा ठराव क्र.२१९ दिनांक १५/०१/२०२५ नुसार मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार शहरातील कै.नथु सुपडू वाणी चॅरीटेबल ट्रस्ट, जळगांव यांचे कडील पत्र दिनांक १६/०९/२०२५ चे पत्रानुसार शहरातील गणपती नगर मधील GST भवन जवळील चौकातील अर्धगोलाकार जागा सुशोभिकरण करणेसाठी मागीतलेली आहे.

सदरचा प्रस्ताव चौक सुशोभिकरण समितीने दिनांक १२/०२/२०२६ व दिनांक ०९/०४/२०२६ रोजीचे बैठकीत मांडण्यात आलेला होता. त्यास मान्यता देण्यात येऊन सदरचा चौक वरील संस्थेस सुशोभिकरण करणेसाठी यापुर्वी इतर संस्थाना देण्यात आलेल्या नियम व अटी शर्ती नुसार (महासभा ठ. क्र. २१९ दिनांक १५/०१/२०२५ नुसार) देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ६५ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- सौ.तायडे सुरेखा नितीन**

**अनुमोदक :- श्री.सपके नितीन प्रभाकर**

**सही /-**
**(दिपमाला मनोज काळे)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**
**मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.**

मंजुर विकास योजना जळगांव (वा.ह) मेहरुण स.नं.४५५/१ मधील ३०.०० मी रुंद रस्त्याची आखणी बदलणे व त्या खालील मुक्त होणारे क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करणे बाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, श्री.गोपाळ देवकर यांनी सदर प्रकरणी न्यायालयीन प्रक्रिया सुरु असलेबाबत पत्र दिलेले असल्याने तसेच प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावाची पुर्ण माहिती नसल्याने सदर प्रकरणी न्यायालयीन दावा दाखल आहे किंवा नाही याची परीपूर्ण माहिती घेवुन पूढील सभेत निर्णय घेण्यात येईल तोपर्यंत सदरचा प्रस्ताव तहकूब ठेवण्यात येत आहे.

**बहुमताने तहकुब**

**अनुकुल मते :- ४८ प्रतिकुल मते :- ०० तटस्थ मते :- १७**

**सुचक :- श्री.सुर्यवंशी रुद्रेंद्र ऊर्फ दिपक प्रभाकर**

**अनुमोदक :- श्री.भोळे विशाल सुरेश (राजु मामा)**

**सही /-**
**(दिपमाला मनोज काळे)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**
**मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.**

प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत पिंप्राळा गट नं.२६०, २६१ व मेहरुण स.नं.५०९ या जागेवर घरकुल बांधकाम करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत पिंप्राळा गट नं. २६०,२६१ व मेहरूण स.नं. ५०९ या जागेवर घरकुल बांधकाम करणे बाबतचा प्रशासनामार्फत प्राप्त प्रस्ताव सभेला वाचुन दाखवण्यात आला व शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 2.0 अंतर्गत पिंप्राळा गट नं. २६०,२६१ व मेहरूण स.नं. ५०९ या महानगरपालिकेच्या मालकीच्या व घरकुला साठी आरक्षित असलेल्या जागेवर प्रधानमंत्री आवास योजना घटक क्र. २ Affordable Housing in Partnership (AHP) (भागीदारी तत्वावर परवडणाऱ्या घरांची निर्मिती) अंतर्गत संयुक्त भागीदारी तत्वावर (AHP/AHP-JV) आर्थिक दुष्ट्या दुर्बल घटक (EWS) व अल्प उत्पन्न घटक (LIG) करीता घरकुल बांधकाम करणे साठी या योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार सुधारित प्रस्ताव तयार करून राज्य व केंद्र शासनाच्या मन्यतेसाठी सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

शासनाच्या मान्यता प्राप्ती नंतर या प्रस्तावाची अंमलबजावणी महानगरपालिके मार्फत निविदा प्रक्रिया राबवुन करण्यात यावी. या साठी आवश्यक अटी शर्ती प्रशासना मार्फत निश्चिंत करण्यात याव्यात.

या योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार पुर्वीच्या तयार नकाशा मध्ये तसेच प्रस्तावात आवश्यक ते फेरबदल करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

या योजनेची प्रभावीपणे व नियोजित वेळेत अंमलबजावणी करण्यासाठी या प्रस्तावावर काम केलेल्या या पुर्वी नियुक्त प्रकल्प व्यस्थापन सल्लागार " शून्य कन्सल्टंट अकोला " यांच्या मार्फत कार्यवाही करण्यास व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

शासन निर्णयनुसार या योजने अंतर्गत बांधण्यात येणाऱ्या घरकुलांसाठी विकास शुल्कात सुट देण्यात आली असुन त्यानुसार प्रस्तावातील घरकुलांसाठी विकास शुल्कात सुट देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सन्मा. सदस्य अरविंद देशमुखः यांनी सुचित केलेनूसार, महानगरपालिकेच्या मालकीच्या व घरकुलांसाठी आरक्षित असलेल्या इतरही जमीनी आहेत, त्यापैकी मेहरूण येथील हायवे च्या दोन्ही बाजुस मेहरूण स.नं. ५३२ (आरक्षण क्र. १३९) आरक्षण क्र. १३२, स.नं. ५०९, आरक्षण क्र. १३५ अ (मेहरूण स.नं. ४ व ११ चा भाग) या ठिकाणी अपुर्ण स्थितीतील घरकुल बांधकामाचा आर.सी.सी. ढाचा हा जिर्ण अवस्थेत उभा आहे व तो आज रोजी उपयोगात घेण्या योग्य नसल्याने तो ढाचा सुरक्षितपणे पाडून ती जमीन समतल करणेसाठी प्रशासनाने आवश्यक कार्यवाही करावी. तसेच या जमीनीवर तसेच महानगरपालिका मालकीच्या व घरकुलांसाठी आरक्षित इतर जमीनीवर देखील या योजनेतुन वर उल्लेख केल्याप्रमाणे घटक क्र. २ Affordable Housing in Partnership (AHP) (भागीदारी तत्वावर परवडणाऱ्या घरांची निर्मिती) अंतर्गत संयुक्त भागीदारी तत्वाबर (AHP/AHP-JV) घरकुल बांधकामाचे प्रस्ताव तयार करून घरकुलांचे बांधकाम पूर्ण करून जळगाव महानगरपालिका क्षेत्रातील जास्तीत जास्त गरजु लाभार्थीना घरकुलाचा लाभ देण्यात यावा यासाठी या योजनेच्या शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (EWS) व अल्प उत्पन्न घटक (LIG) यांच्या समावेश करावा तसेच यासाठी उपयोगात येणाऱ्या जमिनीचे वाणिज्य वापराची शक्यता तपासुन परवडणाऱ्या घरांच्या बांधकामाच्या उदिष्ट पुर्ती साठी त्याचा हि समावेश प्रस्तावात करण्यात यावा, या कामी आवश्यकतेनुसार वेगवेगळया ठिकाणी असलेल्या जमीनीवर एकत्रित प्रस्ताव तयार करावा यासाठी प्रशासनाने आवश्यक कार्यवाही करावी.

उपरोक्त नमुद केल्यानुसार प्रशासनाने आवश्यक ती कार्यवाही करावी व त्यासाठी व योजनेच्या अंमलबजावणीकामी आयुक्त यांना अधिकार प्रदान करण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ६५ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- श्री.देशमुख अरविंद भगवान**
**अनुमोदक :- श्री.घुगे-पाटील राजेंद्र झिपरु**

**सही /-**
**(दिपमाला मनोज काळे)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**
**मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.**

मनपा जळगांव येथे सन २००५ नंतर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना NPS/DCPS लागू करणेबाबत सन्मा.सदस्या,ॲड सौ.शुचिता अतुलसिंह हाडा यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक अनिधी १००५/१२६/सेवा-४ शासन निर्णय दि.३१/१०/२००५ अन्वये दि ०१/११/२००५ रोजी किंवा त्यानंतर शासन /निमशासकीय/ स्थानिक राज्य संस्थांमध्ये नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी जुनी निवृत्तीवेतन योजना बंद करून नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (Defined Contribution Pension Scheme DCPS) लागू करण्यात आलेली आहे. सदर योजना पुढे राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (National Pension System - NPS) म्हणून कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

त्यानुसार जळगाव शहर महानगरपालिकेमध्ये महासभा ठराव ६३. दि. २६/१२/२००७ अन्वये सदर योजना लागू करण्यात आलेली आहे. शासन निर्णयानुसार संबंधित कर्मचाऱ्यांच्या वेतनातून दरमहा १०% कर्मचारी अंशदान कपात करून त्यास समतुल्य नियोक्ता अंशदान जमा करणे, संबंधित कर्मचाऱ्यांचे सेवार्थ ID तयार करणे, PRAN (Per Retirement Account Number) निर्माण करणे, NPS खाते कार्यान्वित करणे व कपात करण्यात आलेली रक्कम निमितपणे संबंधित कर्मचाऱ्यांच्या NPS खात्यात गुंतवणूक करणे आवश्यक आहे.

तथापि, महानगरपालिकेतील सन २००५ नंतर नियुक्त अनेक कर्मचाऱ्यांच्या बाबतीत अत्यंत गंभीर स्वरूपाच्या त्रुटी निदर्शनास आलेल्या आहेत. अनेक कर्मचाऱ्यांच्या वेतनातून नियुक्तीपासून आजतागायत दरमहा १०% प्रमाणे पेंशन अंशदानाची रक्कम नियमित कपात करण्यात आलेली असूनही संबंधित कर्मचाऱ्यांना आजतागायत सेवार्थ ID उपलब्ध करून देण्यात आलेला नाही. तसेच अनेक कर्मचाऱ्यांचे PRAN नंबर निर्माण करण्यात आलेले नाहीत व त्यांच्या नावे NPS खाते प्रत्यक्षात कार्यान्वित झाले आहे अथवा नाही याबाबत स्पष्ट माहिती उपलब्ध नाही.

याशिवाय कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात करण्यात आलेली रक्कम तसेच महानगरपालिकेचे नियोक्ता अंशदान संबंधित कर्मचाऱ्यांच्या NPS खात्यात नियमित जमा झाले आहे अथवा नाही याबाबत लेखापरीक्षणीय स्पष्टता उपलब्ध नाही. PRAN नंबर नसल्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांच्या नावे NPS Tier-I खाते कार्यान्वित झालेले नसण्याची शक्यता असून त्यामुळे कपात करण्यात आलेली रक्कम प्रत्यक्ष गुंतवणुकीत जमा झाली आहे काय याबाबत गंभीर शंका निर्माण झालेली आहे. NPS ही गुंतवणुकीवर आधारित योजना असल्याने दीर्घ कालावधीपर्यंत रक्कम जमा न झाल्यास संबंधित कर्मचान्यांना मिळणारे चक्रवाढ व्याज, मार्केट रिटर्न, निवृत्तीवेतन लाभ व आर्थिक सुरक्षितता यावर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता आहे. भविष्यात यासंदर्भात आर्थिक दायित्व, लेखापरीक्षण आक्षेप, कर्मचारी तक्रारी, न्यायालयीन प्रकरणे व शासन स्तरावरील चौकशी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही

शासन निर्णयानुसार कर्मचारी अंशदान कपात करून ते संबंधित NIPS खात्यात जमा करणे, त्यास समतुल्य नियोक्ता अंशदान जमा करणे, PRAN निर्माण करणे व NPS प्रणाली कार्यान्वित करणे ही नियोक्ता म्हणून महानगरपालिकेची जबाबदारी आहे.

सदर DCPS/NPS संदर्भातीत कामकाज हे आस्थापना विभाग व अर्थ विभाग यांचे संयुक्त स्वरूपाचे कामकाज असून सदर कामकाजामध्ये कर्मचारी सेवा अभिलेख, वेतन कपात, कर्मचारी व नियोक्ता अंशदान, लेखा ताळमेळ, PRAN निर्मिती, NPS खाते पडताळणी इत्यादी वित्तीय व प्रशासकीय बाबींचा समावेश असल्याने Accounting Knowledge असलेले सक्षम कर्मचारी अधिकारी यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करणे आवश्यक आहे.

तसेच महासभेसमोर पुढील गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत :

- कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात करण्यात आलेली रक्कम आजतागायत कोणत्या खात्यात अथवा लेखाशिर्षाखाली जमा आहे? संबंधित कर्मचाऱ्यांच्या NPS खात्यात प्रत्यक्ष रक्कम जमा झाली आहे काय?
- PRAN नंबर नसल्यामुळे कर्मचाऱ्यांच्या गुंतवणुकीवरील व्याज / परतावा यांचे झालेले नुकसान कोण भरून काढणार?
- शासन निर्णय अस्तित्वात असूनही सदर कार्यवाही दीर्घ कालावधीपर्यंत प्रलंबित का राहिली?

वरील बाबींचा विचार करता सदर विषय हा कर्मचाऱ्याऱ्यांच्या निवृत्तीनंतरच्या आर्थिक सुरक्षिततेशी संबंधित अत्यंत महत्वाचा व गंभीर विषय असल्याने पुढीलप्रमाणे कार्यवाही करणेबाबत महासभेची मान्यता घेणे आवश्यक आहे

जबाबदारी / कार्यवाहीचे मुद्दे

सर्व प्रथम सदर कामकाजासाठी आस्थापना विभाग व अर्थ विभाग यांच्या संयुक्त समन्वयाने Accounting Knowledge असलेलेच सक्षम कर्मचारी / अधिकारी याची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात यावी.

१) जळगाव शहर महानगरपालिकेतील सन २००५ नंतर नियुक्त सर्व कर्मचाऱ्यांची NIPS / DCPS संदर्भातील माहिती संकलित करून सविस्तर पडताळणी करण्यात यावी.

२) ज्या कर्मचाऱ्यांचे सेवार्थ ID उपलब्ध नाहीत त्यांचे सेवार्थ ID तात्काळ तयार करण्यात यावेत.

३) ज्या कर्मचाऱ्यांचे PRAN नंबर निर्माण झालेले नाहीत त्यांचे PRAN नंबर तात्काळ निर्माण करून NPS खाते कार्यान्वित

करण्यात यावे.

४) कर्मचाऱ्यांच्या वेतनातून नियुक्तीपासून आजतागायत कपात करण्यात आलेली कर्मचारी अंशदानाची रक्कम तसेच महानगरपालिकेचे नियोक्ता अंशदान शासन नियमांनुसार संबंधित कर्मचाऱ्यांच्या NPS खात्यात जमा करण्यात यावे.

५) प्रलंबित कालावधीतील रक्कम व्याज, गुंतवणूक परतावा व इतर वित्तीय दायित्व याबाबत शासन स्तरावर आवश्यक मार्गदर्शन घेण्यात यावे.

६) संबंधित कर्मचाऱ्याऱ्यांच्या :

- सेवार्थ ID स्थिती,
- PRAN स्थिती,
- कर्मचारी अंशदान,
- नियोक्ता अंशदान,
- NPS खाते स्थिती,
- प्रलंबित रक्कम,
- लेखा ताळमेळ

यांची सविस्तर पडताळणी करण्यात यावी

७) कर्मचारी व महानगरपालिकेचे प्रलंबित अंशदान शासन नियमांनुसार जमा करण्याबाबत आवश्यक प्रस्ताव तयार करण्यात यावा.

८) सदर संपूर्ण कामकाज कालबद्ध पद्धतीने पूर्ण करून ३० दिवसांच्या आत त्याबाबतचा सविस्तर अहवाल महासभेस सादर करण्यात यावा.

९) सदर कामकाजाचा नियमित आढावा आयुक्त महोदय यांच्या स्तरावर घेण्यात यावा.

मनपा जळगांव येथे सन २००५ नंतर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना NPS/DCPS लागू करणेस तसेच उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ६५ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- ॲड.सौ.हाडा शुचिता अतुलसिंह**

**अनुमोदक :- श्री.काळे अमित पांडुरंग (बंडुदादा)**

**सही /-**
**(दिपमाला मनोज काळे)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**
**मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.**

पिंप्राळा शिवार गट क्रं.७७ येथे जैवविविधता उदयान (Bio-Diversity Park) आणि मेहरुण शिवार गट क्रं.४६४/४अ+५ब येथे मियावाकी वनसंवर्धन प्रकल्प (अटल घनवन उदयान) कार्यान्वित करण्यासाठी सदर खुले भूखंड समर्पण संस्था संचालित, पर्यावरण व निसर्ग संवर्धन शाळा,जळगांव यांना देणेबाबत श्री.राजेंद्र नन्नवरे, कार्यकारी संचालक, समर्पण संस्था संचालित, पर्यावरण व निसर्ग संवर्धन शाळा,जळगांव यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, 'समर्पण' संस्थेमार्फत सन २००५ पासून महाराष्ट्रातील खान्देश परिसरात पर्यावरण संवर्धन व जनजागृतीच्या क्षेत्रात सातत्याने कार्यरत आहे. संस्थेच्या माध्यमातून पर्यावरण व निसर्ग संवर्धन शाळा, वसुंधरा महोत्सव, पर्यावरण साहित्य संमेलन, व्याघ्र परिषद इत्यादी उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आले आहेत. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये व नागरिकामध्ये पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

समर्पण संस्था Societies Registration Act १८६० अंतर्गत नोदणीकृत असून नोंदणी क्रमांक MAH/७१०३/JAL आहे. तसेच Mumbai Public Charitable Trust Act १९५० अतर्गत नोंदणी क्रमांक F-६२६६. Jalgaon आहे.

मागील दोन वर्षापासून समर्पण संस्था जैवविविधता सवर्धन व मियावाकी वननिर्मिती या अभिनव प्रकल्पांवर विशेष भर देत आहे. त्या अनुषंगाने, खेडी (ता. एरडोल) येथे सुमारे एक एकर क्षेत्रावर CSR निधीच्या सहाय्याने मियावाकी पद्धतीने वनसंवर्धन प्रकल्प यशस्वीरित्या राबविण्यात आला असून, त्या ठिकाणी अल्पावधीतच घनदाट, समृद्ध आणि स्वयपूर्ण असे नैसर्गिक वन विकसित झाले आहे. हा प्रकल्प स्थानिक जैवविविधतेच्या पुनर्स्थापनेसाठी एक आदर्श नमुना ठरला आहे.

जळगाव शहरातही अशाच प्रकारचे जैवविविधता उद्यान आणि मियावाकी वनसवर्धन प्रकल्प विविध ठिकाणी राबविण्याचा समर्पण संस्थेचा मानस आहे. या अनुषंगाने आपले पत्र जशमनपा/७०/१८ एप्रिल २०२६ व शासन शासन निर्णय क्र.सा.व.वी-२०१९/प्र.क्र.३/एफ-११ दिनांक २५ जून २०१९ महसूल व वन विभाग,महाराष्ट्र शासन नुसार पिंप्राळा शिवार गट क्रमांक ७७ येथे जैवविविधता उद्यान (Bio Diversity Park) आणि मेहरूण शिवार गट क्रमाक ४६४/४अ + ५ब येथे मियावाकी वनसंवर्धन प्रकल्प (अटल घनवन उद्यान) या ठिकाणी कार्यान्वित करण्यासाठी सदर खुले भूखंड समर्पण संस्थेस पावसाळा सुरू होण्यापूर्वी देण्याचा ठराव झाल्यास आम्हास प्रारंभिक प्रक्रिया पूरण करता येईल असे त्यांनी म्हटले आहे.

या साठी समर्पण संस्था संचालित, पर्यावरण व निसर्ग संवर्धन शाळा,जळगांव यांनी CSR आणि अन्य माध्यमातून स्वनिधी उभा करावा मनपा कडून या प्रकल्पासाठी निधी दिला जाणार नाही. १) पिंप्राळा शिवार गट क्रं.७७ येथे जैवविविधता उदयान (Bio-Diversity Park) आणि २) मेहरुण शिवार गट क्रं.४६४/४अ+५ब येथे मियावाकी वनसंवर्धन प्रकल्प (अटल घनवन उदयान) कार्यान्वित करण्यासाठी सदर खुले भूखंड समर्पण संस्था संचालित, पर्यावरण व निसर्ग संवर्धन शाळा,जळगांव यांना देणेस खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सदरील जागा हस्तांतरणाबाबतची कारवाई नगररचना विभागाकडुन करुन घेण्यात यावी, जेणेकरुन कोणतीही कायदेशीर अडचण भविष्यात उद्भवणार नाही. सदरील भूखंड यापुर्वी याच कामासाठी कोणाला देण्याचा ठराव झालेला असल्यास त्यांना दुसऱ्या ले-आऊट मधील जागा देण्यात येईल.

१. संबंधित भूखंडावर केवळ वृक्षलागवड व पर्यावरण संवर्धनाशी संबंधित उपक्रमच राबविण्यात यावेत.
२. जळगांव महानगरपालिकेची पूर्व लेखी परवानगी घेतल्याशिवाय कोणतेही बांधकाम अथवा अन्य काम करण्यात येऊ नये.
३. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी महानगरपालिकेकडे कोणत्याही प्रकारचा आर्थिक निधी मागितला जाणार नाही.
४. प्रकल्प राबविताना जैवविविधता संवर्धन, स्थानिक प्रजातींचे संवर्धन व पर्यावरणीय संतुलन यांचा विशेष विचार करण्यात यावा.
५. प्रकल्पाच्या प्रगती विषयी वेळोवेळी महानगरपालिकेस अहवाल सादर करावा.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ६५ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- ॲड.सौ.हाडा शुचिता अतुलसिंह**
**अनुमोदक :- श्री.काळे अमित पांडुरंग (बंडुदादा)**

**सही /-**
**(दिपमाला मनोज काळे)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**
**मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.**

मनपा सागर पार्क मैदान क्रिकेट खेळासाठी आरक्षण न देणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.नितीन मनोहर बरडे यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, मनपा सागर पार्क मैदान क्रिकेट खेळासाठी आरक्षण न देणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.नितीन मनोहर बरडे यांनी दिलेला प्रस्ताव नामंजूर करण्यात येत आहे. सागर पार्क परिसरात मोठ्या प्रमाणावर रहिवासी नागरीकांची वस्ती असून सदर सागर पार्क या मैदानात विविध क्रिकेट प्रिमियरच्या सामने नियमित सुरु असतात. सदर वेळी DJ लावणे तसेच सदर क्रिकेट सामने सुरु असतांना क्रिकेटचे समालोचन लाऊड स्पिकरवर मोठ्या आवाजात केले जात असते. सदर मैदानाजवळ विविध कोचिंग क्लासेस स्थित असून परिक्षा सुरु असतांना जास्त मोठ्या आवाजामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते. परिसरातील रहिवासी यांना ध्वनिप्रदुषणाचा कायमचा त्रास आहे. घरातील वयोवृध्द, लहान मुले, आजारी व्यक्ति सगळयांनाच ध्वनिप्रदुषणाचा कायमचा मनस्ताप होत असतो. तसेच क्रिकेटचे सामने संपल्यानंतर सामना पाहणारे प्रेषकांनी खाल्लेले खाद्य पदार्थ, इतर कचरा तेथेच टाकण्यात येतो यामुळे परिसरात दुर्गंधी देखिल येत असते. यामुळे परिसरातील रहिवाश्यांना हा कायमचाच त्रास आहे. याबाबत या परिसरातील सागर पार्क रेसिडेन्ट फोरमच्या सदस्यांनी देखिल जळगांव शहर महानगरपालिकेत तक्रार केलेली आहे. सागर पार्क परिसरातील नागरिकांना होणाऱ्या त्रासा इतकाच त्रास हा शिवतिर्थ मैदान परिसरातील नागरिकांना देखिल होतो. सदरील मैदान हे जिल्हा परिषदचे अख्यारित असले तरी शेवटी ते महानगरपालिका हद्दीतील मैदान आहे. सबब आज सागर पार्क मैदानाचे क्रिकेट किंवा अन्य कार्यक्रमांसाठी आरक्षण देतांना ज्या अटी-शर्ती ठरवण्यात येत आहेत त्या शिवतिर्थ मैदानावर देखिल बंधनकारक असतील. तसे पत्र प्रशासनामार्फत या ठरावाची प्रतीसह जळगांव जिल्हा परिषद यांना पाठवावे.

करीता उपरोक्त नमुद कारणास्तव तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनूसार जळगांव मनपाचे सागर पार्क मैदान हे यापूर्वी मनपाने ठरवून दिलेल्या अटी-शर्तीसह खालील नमूद अटी-शर्तींवर क्रिकेटच्या सामन्यांसाठी आरक्षण देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१. क्रिकेटच्या सामन्यांसाठी आयोजकांना सागर पार्क तसेच शिवतीर्थ मैदानावर DJ तसेच मोठे स्पीकर लावता येणार नाही केवळ कॉमेंट्रीसाठी मर्यादित आवाजाचा स्पीकर वापरता येईल. सदर स्पीकरची देखिल न्यायालयाने ठरवून दिलेली ध्वनि मर्यादा ओलांडल्यास सामने त्वरीत रद्द करण्यात येतील.
२. इयत्ता १० वी, १२ वी च्या परीक्षा काळात क्रीडा स्पर्धेला परवानगी मिळणार नाही.
३. पोलिस भरतीसाठी मैदानावर धावण्याचा सराव करणाऱ्या तरुणांना स्पर्धाचालक सराव करु देतील त्यांना कोणताही अटकाव करणार नाही.
४. प्रत्येक स्पर्धाचालकांनी रक्तदान शिबिर घेवुन किमान ५० रक्त पिशव्या संकलित कराव्यात.

प्रशासनाने सागर पार्क येथिल तुटलेले गेट तत्काळ दुरुस्त करावे, स्वच्छता व लाईटची व्यवस्था, आवश्यक ठिकाणी चेनलिंक फेन्सींग करणेत यावे तसेच जळगांव रनर्सगृप करीता सागर पार्क मैदान डिसेंबर महिन्याचा पहिल्या व दुसऱ्‍या शनिवार, रविवार कायमस्वरुपी आरक्षीत ठेवण्यात यावे. त्यावेळी कोणत्याही क्रिकेट सामन्यांसाठी तसेच इतर कोणत्याही कार्यक्रमासाठी आरक्षण देण्यात येवू नये.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ६५ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- श्री.बरडे नितीन मनोहर**
**अनुमोदक :- ॲड.सौ.हाडा शुचिता अतुलसिंह**

**सही /-**
**(दिपमाला मनोज काळे)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**
**मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.**

जळगांव शहर महानगरपालिकेच्या बँक खात्यातील रु.२५.०० कोटीची रक्कम सुरक्षित ठेवणेकामी तात्काळ एस्क्रो खाते उघडून त्यात वर्ग करुन त्यातून विकास कामांची निविदा प्रक्रिया त्वरित राबविण्याकामी मान्यता मिळणेकामी सन्मा.सदस्य,श्री.अरविंद भगवान देशमुख यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, मे. न्यायालयाने अलीकडेच अनेक प्रकरणांमध्ये दिलेल्या विविध आदेशांच्या अनुषंगाने, महानगरपालिकेचा सुमारे रु.३३.०० कोटींपेक्षा अधिक निधी अनियोजित स्वरूपात खर्च व्यय झाला आहे. सदर खर्च हा महानगरपालिकेच्या विद्यमान गरजांची पूर्ती करणारा नसून, तीन दशकांहून अधिक काळ प्रलंबित असलेल्या न्यायालयीन प्रकरणातून उद्भवलेले देयक अदा करण्यासाठी खर्च करण्यात आला आहे. त्यामुळे या खर्चातून नागरिकांना तत्काळ कोणत्याही सुविधा किंवा सेवांचा थेट लाभ प्राप्त झालेला नाही.

परिणामी, महानगरपालिकेच्या बँक खात्यातील उपलब्ध मर्यादित निधीपैकी अत्यंत मोठी रक्कम अनियोजित रित्या खर्ची पडली असून, नियोजित वार्षिक विकासकामांचे प्रस्ताव प्रलंबित राहिले आहेत. यामुळे नागरिकांच्या अपेक्षांवर व विकासकामांवर प्रतिकूल परिणाम झाला आहे.

सद्यस्थितीत अशा स्वरूपाची अनेक न्यायालयीन प्रकरणे अद्याप प्रलंबित असून, कोणत्याही क्षणी तत्सम आदेश निर्गमित होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. यामुळे महानगरपालिकेची आर्थिक तरलता संपुष्टात येऊन विकासकामांसाठी आवश्यक निधी इतरत्र खर्च होण्याचा गंभीर धोका मनपा समोर स्पष्ट दिसत आहे.

वरील परिस्थितीचा विचार करता, महानगरपालिकेच्या बँक खात्यातील रु. २५.०० कोटी इतकी रक्कम सुरक्षित राखण्यासाठी स्वतंत्र एस्क्रो खाते तात्काळ उघडून त्यामध्ये सदर रक्कम जमा करणे अत्यावश्यक आहे,

जेणेकरून सदर निधीचा उपयोग केवळ भांडवली खर्चाच्या स्वरूपातील विकासकामांसाठी नियोजित पद्धतीने करता येईल व त्याचा थेट लाभ नागरिकांना तात्काळ मिळेल. तसेच, भविष्यात उद्भवू शकणाऱ्या कोणत्याही आकस्मिक किंवा अनपेक्षित देयक जबाबदाऱ्या निर्माण झाल्यास देखील सदर निधी सुरक्षित राहून महानगरपालिकेची आर्थिक स्थिरता व नागरिकांच्या हिताचे संरक्षण सुनिश्चित होईल.

यासोबतच, नागरिकांना तातडीने दिलासा देण्याच्या उद्देशाने विकासकामे वेळेत पूर्ण होण्यासाठी कंत्राटदारांना निधीची वेळेवर उपलब्धता सुनिश्चित करणे आवश्यक आहे. त्यासाठी संबंधित विकासकामांसाठी निविदा प्रक्रिया तात्काळ राबविणे अत्यावश्यक असून, त्याद्वारे कामे नियोजनबद्ध पद्धतीने वेळेत मार्गी लागून पूर्ण होतील.

त्यामुळे, जळगांव शहर महानगरपालिकेच्या बँक खात्यातील रु.२५.०० कोटीची रक्कम सुरक्षित ठेवणेकामी तात्काळ एस्क्रो खाते उघडून त्यात वर्ग करुन त्यातून विकास कामांची निविदा प्रक्रिया त्वरित राबविण्याकामी सभेत सन्मा.सदस्य श्री.अरविंद देशमुख यांनी मा.पिठासिन अधिकारी यांना दिलेल्या पत्रात खालील नमूद केलेल्या सूचनांनूसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

एस्क्रो ठराव मध्ये खालील बाबी कायदेशीरदृष्ट्या मजबूत पद्धतीने incorporate कराव्यात.

१) संरक्षित प्रकल्पनिहाय निधीचे स्वरूप (Project Specific Protected Contractual Fund Character) :

सदर Escrow Account मधील निधी हा महानगरपालिकेच्या सामान्य निधीचा भाग म्हणून वापरासाठी उपलब्ध राहणार नसून, तो विशिष्ट विकासकामांच्या अंमलबजावणीसाठी करारबद्ध, पूर्वनियोजित व संरक्षित निधी (Project Specific Protected Contractual Fund) म्हणून राखीव राहील.

२) सार्वजनिक हित व नागरी पायाभूत सुविधा संरक्षण तरतूद (Public Interest & Civic Infrastructure Protection) :

सदर निधी हा जळगाव शहरातील मूलभूत नागरी सुविधा व इतर अत्यावश्यक विकासकामांची अखंडित, समयबद्ध व गुणवत्तापूर्ण अंमलबजावणी सुनिश्चित करण्याच्या व्यापक सार्वजनिक हिताच्या उद्देशाने संरक्षित ठेवण्यात येत आहे.

सदर निधी हा सामान्य प्रशासकीय वापरासाठी उपलब्ध निधी नसून, मनपा मार्फत मंजूर विकासकामांच्या पूर्ततेसाठी पूर्वनियोजित, विनियोजित व सार्वजनिक हिताशी प्रत्यक्ष निगडीत संरक्षित निधी म्हणून ग्राह्य राहील.

सदर निधीचा वापर अथवा प्रवाह बाधित झाल्यास महानगरपालिकेच्या अत्यावश्यक नागरी सेवा व विकासकामांच्या अंमलबजावणीवर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता राहील.

३) निधी वळविण्यावर निर्बंध (Restriction on Diversion of Funds) :

सदर खात्यातील निधी कोणत्याही इतर प्रशासकीय, आकस्मिक, अनियोजित खर्च, देणी, न्यायालयीन वसुली, recovery proceedings अथवा इतर दाव्यांसाठी वापरण्यात किंवा वळविण्यात येणार नाही.

४) प्रकल्प संलग्न एस्क्रो यंत्रणा (Project Linked Escrow Mechanism) :

महानगरपालिकेमार्फत उघडण्यात येणारे प्रत्येक Escrow Account हे विशिष्ट विकासकामे, निविदा प्रक्रिया अथवा करारबद्ध प्रकल्पांशी स्पष्टपणे संलग्न राहील.

Escrow Account उघडताना संबंधित विकासकामाचे / निविदेचे नाव, निविदा क्रमांक, प्रशासकीय मान्यता, अंदाजित खर्च, संबंधित विभाग, निधीचा उद्देश व देयकांचे स्वरूप यांचा स्पष्ट उल्लेख Escrow Agreement मध्ये करणे बंधनकारक राहील.

५) मोठ्या प्रकल्पांसाठी स्वतंत्र एस्क्रो खाते (Separate Escrow for Large Value Projects) :

मोठ्या आर्थिक मूल्याच्या स्वतंत्र विकासकामे अथवा निविदांसाठी स्वतंत्र Escrow Account उघडण्यात येईल व सदर खात्यातील निधीचा वापर केवळ त्या विशिष्ट निविदा/कराराच्या अंमलबजावणीपुरताच मर्यादित राहील.

६) अल्प रकमेच्या विकासकामांसाठी कॉमन/जॉईंट एस्क्रो खाते (Common/Joint Escrow for Small Value Works) :

अल्प रकमेच्या विविध विकासकामांसाठी आवश्यकतेनुसार Common/Joint Escrow Account उघडण्यात येऊ शकेल. तथापि अशा खात्यामध्ये समाविष्ट सर्व निविदा, विकासकामे, अंदाजित रक्कम, संबंधित मंजुरी व निधी वितरणाची माहिती Escrow Agreement मध्ये स्वतंत्र अनुसूची (Schedule) स्वरूपात स्पष्टपणे नमूद करणे बंधनकारक राहील.

७) निविदा अथवा प्रशासनिक मान्यता प्रलंबित असताना कार्यपद्धती (Procedure Where Tender / Administrative Approval is Pending) :

ज्या प्रकरणांमध्ये निविदेचे नाव अंतिम झालेले नसेल अथवा प्रशासकीय मान्यता प्रलंबित असेल, अशा परिस्थितीत प्राथमिक स्वरूपात Common Escrow Account मध्ये निधी वर्ग करण्यात येऊ शकेल. तथापि संबंधित निविदा निश्चित झाल्यानंतर व प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर, मोठ्या आर्थिक मूल्याच्या कामांसाठी स्वतंत्र Escrow Account निर्माण करणे आवश्यक राहील.

८) त्रिपक्षीय एस्क्रो करार (Tripartite Escrow Agreement) :

मोठ्या रकमेच्या विकासकामांसाठी महानगरपालिका, संबंधित बँक व नियुक्त मक्तेदार यांच्यामध्ये स्वतंत्र Tripartite Escrow Agreement करण्यात येईल.

सदर करारामध्ये निधी वितरण, देयकांचे टप्पे, मोजमाप प्रमाणपत्र, निधी खर्चाची पद्धती, खर्चाचे बाबतचे निर्बंध, करारबद्ध जबाबदाऱ्या व निधी संरक्षणासंबंधी सर्व अटी स्पष्टपणे नमूद करण्यात याव्यात.

९) मक्तेदाराचे मर्यादित करारबद्ध हितसंबंध (Contractor's Limited Contractual Interest) :

सदर Escrow Account मधील निधीवर संबंधित विकासकामांच्या अंमलबजावणीसंदर्भात करारबद्ध देयकांपुरते संबंधित मक्तेदाराचे मर्यादित हितसंबंध (Limited Contractual Interest) निर्माण होतील.

जळगांव शहर महानगरपालिकेच्या बँक खात्यातील रु.२५.०० कोटीची रक्कम सुरक्षित ठेवणेकामी तात्काळ एस्क्रो खाते उघडून त्यात वर्ग करुन त्यातून विकास कामांची निविदा प्रक्रिया त्वरित राबविण्याकामी सन्मा.सदस्य,श्री.अरविंद भगवान देशमुख यांनी दिलेल्या पत्रानूसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ६५** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- श्री.देशमुख अरविंद भगवान**

**अनुमोदक :- श्री.लड्ढा नितीन बालमुकुंद**

**सही /-**

**(दिपमाला मनोज काळे)**

**महापौर**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**

**मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.**

महानगरपालिकेच्या आर्थिक व्यवहारांचे सुनियोजित व्यवस्थापन, त्यासंबंधीत पारदर्शकता व उत्तरदायित्व वाढविणे तसेच अनावश्यक खर्चावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी "अर्थ समिती" स्थापन करण्याबाबत सन्मा.सदस्य,डॉ.श्री.राधेश्याम धर्मराज चौधरी यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, महानगरपालिकेच्या आर्थिक व्यवहारांचे सुनियोजित व्यवस्थापन, त्यासंबंधीत पारदर्शकता व उत्तरदायित्व वाढविणे तसेच अनावश्यक खर्चावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी "अर्थ समिती" स्थापन करण्याबाबत सन्मा.सदस्य,डॉ.श्री.राधेश्याम धर्मराज चौधरी यांनी दिलेला प्रस्ताव सभागृहात झालेल्या चर्चेनूसार तहकूब ठेवणेस मान्यता देण्यात येत आहे.

**सर्वानुमते तहकुब**

**अनुकुल मते :- ६५ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- श्री.लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- श्री.सुर्यवंशी रुद्रेंद्र उर्फ दिपक प्रभाकर**

**सही /-**
**(दिपमाला मनोज काळे)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**
**मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.**

महानगरपालिकेच्या हितसंरक्षण व विधी विषयक कामकाजाच्या प्रभावी नियंत्रणाकरिता आवश्यक विधी समिती स्थापन करण्याबाबत सन्मा.सदस्या,ॲड सौ.शुचिता अतुलसिंह हाडा यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, महानगरपालिकेच्या हितसंरक्षण व विधी विषयक कामकाजाच्या प्रभावी नियंत्रणाकरिता आवश्यक विधी समिती स्थापन करण्याबाबत सन्मा.सदस्या,ॲड सौ.शुचिता अतुलसिंह हाडा यांनी दिलेला प्रस्ताव सभागृहात झालेल्या चर्चेनूसार तहकूब ठेवणेस मान्यता देण्यात येत आहे.

**सर्वानुमते तहकुब**

**अनुकुल मते :- ६५ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- श्री.बालाणी प्रकाश रावलमल (पिकी)**
**अनुमोदक :- श्री.लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**सही /-**
**(दिपमाला मनोज काळे)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**
**मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.**